**हुडको या वित्तीय संस्थेकडून आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या कर्जावरील व्याज अदा करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः- पीएचडी १६०२७/२९/२०२५ (पा.सु.२)**
१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल आवार,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांकः- २४ ऑगस्ट, २०२६.

वाचा:

१) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. HUDCO-२०२१/C.R.२४३/Arogya ३ दि.१९ जानेवारी, २०२२.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.२९९/आरोग्य ३, दि.२४ नोव्हेंबर,२०२२.
३) हुडको या वित्तीय संस्थेचे पत्र क्र. एच/एमआरओ/मांग/३४८/२०२६/३३८, दि.२१.०४.२०२६.

**प्रस्तावना:**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत मंजूर आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून रू. ३९४८.०० कोटी कर्ज घेण्यासाठी ३ वर्षाचा अधिस्थगन कालावधी आणि त्यापुढे १० वर्ष परतफेडीचा कालावधी तसेच इतर अटी व शर्तीसह दिनांक २१.१२.२०२१ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने संदर्भाधीन अ.क्र. १ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत चालू व नवीन आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार हुडकोकडून आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी कर्ज उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. हुडको या वित्तीय संस्थेकडून प्राप्त झालेल्या कर्जाचे माहे फेब्रुवारी, मे, ऑगस्ट व नोव्हेंबर अखेर पर्यंत व्याज भरण्याचे चार टप्पे आहेत. सदर महिन्यांच्या अखेर व्याज हुडको या वित्तीय संस्थेस अदा न केल्यास त्यावर दंडणीय रक्कम भरावी लागणार असल्याची अट करारामध्ये नमूद आहे. तसेच संदर्भाधीन अ.क्र.२ अन्वये हुडकोच्या कर्जावरील व्याजाची देयके तयार करुन ते अदा करण्यासाठी या विभागातील कक्ष अधिकारी (रोख शाखा) (डी.डी.ओ.कोड ७१०१००२३०५) यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. त्यानुषंगाने हुडकोकडून घेण्यात आलेल्या कर्जावरील दि.०१/०६/२०२६ ते दि.३१/०८/२०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीतील व्याज एकुण रु. ४४,०४,३१,५९४/- (अक्षरी रुपये चौरेचाळीस कोटी चार लक्ष एकतीस हजार पाचशे चौऱ्यान्नव कोटी फक्त) हुडको या वित्तीय संस्थेस अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मागणीनुसार सुरु असलेल्या आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी पहिल्या टप्प्यामध्ये ८.६१% (तीन वर्षासाठी निश्चित त्रैमासिक व्याज) देय आधारावर रु. १८६.९९ कोटी निधीचे कर्ज वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये ९.१२% (तीन वर्षासाठी निश्चित त्रैमासिक व्याज) देय आधारावर दिनांक २९.०३.२०२३ रोजी रु.१०२.७१ कोटी निधीचे कर्ज, तिसऱ्या टप्प्यामध्ये ९.१२% (तीन वर्षासाठी निश्चित त्रैमासिक व्याज) देय आधारावर दिनांक १६.१०.२०२३ रोजी रु.२४०.४५ कोटी निधीचे कर्ज, चौथ्या टप्प्यामध्ये ९.३८% (तीन वर्षासाठी निश्चित त्रैमासिक व्याज) देय आधारावर दिनांक ०४.०१.२०२४ रोजी रु.२३५.०० कोटी निधीचे कर्ज, पाचव्या टप्प्यामध्ये ९.३८% (तीन वर्षासाठी निश्चित त्रैमासिक व्याज) देय आधारावर दिनांक २६.०३.२०२४ रोजी रु.३००.०० कोटी निधीचे कर्ज, सहाव्या टप्प्यामध्ये ८.८०% (तीन वर्षासाठी निश्चित त्रैमासिक व्याज) देय आधारावर दि.१७.०३.२०२५ रोजी रु.३९३.०७, सातव्या टप्प्यामध्ये ८.६४% (तीन वर्षासाठी निश्चित त्रैमासिक व्याज) देय आधारावर दि.१०.१०.२०२५ रोजी रु.१२७.७०, आठव्या टप्प्यामध्ये ८.६४% (तीन वर्षासाठी निश्चित त्रैमासिक व्याज) देय आधारावर दि.०९.०१.२०२६ रोजी रु.२८४.२० कोटी, नवव्या टप्प्यामध्ये ८.६४% व्याज दराने दि.०६.०३.२०२६ रोजी रु.२११.५१ कोटी व दहाव्या टप्प्यामध्ये ८.६४% व्याज दराने दि.०७.०७.२०२६ रोजी रु.३००.०० कोटी निधीचे कर्ज हुडको या वित्तीय संस्थेकडून उपलब्ध करुन घेण्यात आले आहे.

२. हुडकोकडून घेण्यात आलेल्या कर्जावरील दि.०१/०६/२०२६ ते दि.३१/०८/२०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीतील व्याज एकुण रु. ४४,०४,३१,५९४/- (अक्षरी रुपये चौरेचाळीस कोटी चार लक्ष एकतीस हजार पाचशे चौऱ्यान्नव कोटी फक्त) भरण्याबाबत हुडको या वित्तीय संस्थेने मागणी दिलेली आहे. तसेच सदर व्याज माहे ऑगस्ट, २०२६ अखेर पर्यंत भरणे आवश्यक आहे. तसेच सदर रक्कम जमा करण्याबाबतच्या खात्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे:-

| | | |
|---|---|---|
| "Name of Beneficiary | : | Housing and Urban Development Corporation Limited |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Beneficiary Virtual A/C No | : | 00000036015854586 |
| IFSC Code | : | SBIN0017313" |

३. हुडकोकडून प्राप्त होणाऱ्या कर्जावरील व्याज अदा करण्यासाठी येणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विभागाच्या मुख्य लेखाशिर्ष मागणी क्र. आर-१, ०१, देशांतर्गत ऋणांवरील व्याज, २००, देशांतर्गत इतर ऋणांवरील व्याज, (००) भारित (००) (०१) आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन व बांधकामासाठी हुडकोकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज अनिवार्य, ४५, व्याज (२०४९ २७८३) अंतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हुडकोकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रानुसार एकुण रु. ४४,०४,३१,५९४/- (अक्षरी रुपये चौरेचाळीस कोटी चार लक्ष एकतीस हजार पाचशे चौऱ्यान्नव कोटी फक्त) इतके व्याज हुडको या वित्तीय संस्थेस बिनशर्त अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.०९.०४.२०२६ नुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये अनिवार्य खर्चाकरीता निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२४१११७००१११७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADIP PISE

Digitally signed by KAVITA PRADIP PISE
DN: cn=KAVITA PRADIP PISE, o, ou, email=kavita.pise@nic.in, c=IN
Date: 2026.08.24 13:02:29 +05'30'

**( क.प्र. पिसे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
६. उप/सह सचिव, अर्थसंकल्प, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. उप/सह सचिव, रोख-शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. आहरण व संवितरण अधिकारी तथा कक्ष अधिकारी (रोख शाखा), सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी (अर्थबळ) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय राज्यस्तर), आयुक्तालय, मुंबई.
११. निवडनस्ती (पायाभूत सुविधा-२).